ePaper
वर्ष - 9 । अंक - 158 UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 3 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# मुंबई महापालिकेत मनसेचा भाजपला पाठिंबा?




पान 2 वरुन...

पोर्शे अपघातातील तीन आरोपींना जामीन

## अजितदादा पवारांच्या विमान अपघातावर छगन भुजबळांची प्रतिक्रिया

# अजितदादांच्या विमान अपघातात गडबड?



महाईन्यूज । मुंबई

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारीला विमान अपघातात मृत्यू झाला. ज्यामुळे अवघा महाराष्ट्र हळहळला. त्यांना अखेरचा निरोप देताना बारामतीसह महाराष्ट्राचे डोळे पाणावले होते. शरद पवार आणि पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. तसंच काम करणारा लोकनेता गेला अशी भावना जनतेच्या मनात होती आणि आहे. दरम्यान अजित पवारांच्या मृत्यूनंतर आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने शोकसभा आयोजित केली होती. या शोकसभेत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी विमानाचा अपघात झाला त्यावेळी काहीतरी गडबड झाली असं म्हटलं आहे.**

अजित पवार आपल्यातून निघून गेले आहेत. मी साधारण तीन ते चार महिन्यांनी कॅबिनेट मिटिंगला जायचं ठरलं. त्याआधी साधारण मी आणि अजित पवार अर्धा दिवस बरोबर होतो. २८ जानेवारीला वर्तमानपत्र वाचत असताना समीर आला आणि सांगितलं की दादांच्या विमानाला अपघात झाला. नंतर त्याने सांगितलं दादा गेले. अजित पवार गेले यावर विश्वासच बसत नाही. देशात विमानांचे आणि हेलिकॉप्टरचे अनेक अपघात झाले. महाराष्ट्रात अशा प्रकारचा भयंकर अपघात आणि तो देखील इतक्या मोठ्या व्यक्तीच्याबाबतीत मी पहिल्यांदाच अनुभवतो आहे. असं छगन भुजबळ यांनी अजित पवार यांच्या शोकसभेत सांगितलं.

### काहीतरी गडबड झाली आहे..

छगन भुजबळ म्हणाले, मी जेव्हा प्रत्यक्ष त्या ठिकाणी गेलो तेव्हा मला हा प्रश्न पडला की विमान इथे आलंच कसं काय? टेबलटॉप आहे तर विमान साधारण ७० फूट खाली कोसळलं? सीसीटीव्ही कव्हरेज आम्ही पाहिलं एक घिरटी घालून विमान गेल्यानंतर दुसऱ्या घिरटीच्या वेळी सरळ असलेलं विमान पलटी मारताना दिसतं आहे आणि त्यानंतर होत्याचं नव्हतं झालं. चौकशी होईल, मी काही त्यातला तज्ज्ञ नाही पण कुठे तरी काही तरी गडबड झाली आहे. इंजिनात किंवा रडारमध्ये. या सगळ्याची चौकशी होईल, त्याची माहितीही येईल. पण ही सोन्यासारखी माणसं गेली ती कशी परत येतील? असा प्रश्न छगन भुजबळ यांनी विचारला. अजित पवारांचं आयुष्य पाहिलं, तर अजित पवार लहान असतानाच त्यांचे वडील गेले. शरद पवारांच्या देखरेखीखाली अजितदादा लहानाचे मोठे झाले. अचूक वेळी येणं, कामं करणं या सगळ्या गोष्टींचा ठेवा शरद पवारांकडूनच त्यांच्याकडे आला. असंही छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

### अजितदादांकडून खूप काही शिकलो; छगन भुजबळ

शेतकऱ्यांचे प्रश्न असोत, क्रीडा क्षेत्रातले प्रश्न असोत दादा सोडवायचे. त्यांचा दराराही होता. सकाळपासून काम करणं हे त्यांनाच शक्य होतं. सकाळी ६ किंवा ७ वाजता बैठक घेण्यास सुरुवात करायचे. टापटीप, स्वच्छता याबाबत त्यांचा स्वभाव काटेकोर होता. अनेक गोष्टी त्यांच्याकडून शिकता येतील. मी १९९१ मध्ये सुधाकरराव यांच्या मंत्रिमंडळात होतो. ९३ ला शरद पवार आले, त्यानंतर दादा मंत्रिमंडळात आले, तेव्हापासून आम्ही एकत्र काम करत आहोत अशी आठवणही छगन भुजबळ यांनी सांगितलं.



# पोर्शे अपघातातील तीन आरोपींना जामीन

## सुप्रीम कोर्टाचा दिलासा; दीड वर्षांनंतर आरोपींची जामिनावर सुटका

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे पोर्शे अपघात प्रकरणात तीन आरोपींना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. पुण्यातील कल्याणी नगर येथे झालेल्या या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपींच्या रक्ताचे नमुने बदलल्याच्या आरोपाखाली आदित्य अविनाश सूद, आशिष सतीश मित्तल आणि अमर संतोष गायकवाड यांना पोलिसांनी अटक केली होती. अपघातावेळी कारमध्ये असलेल्या आणि त्यावेळी अल्पवयीन असलेल्या आरोपींच्या रक्ताचे नमुने स्वतःच्या रक्ताच्या नमुन्यांशी बदलल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.**



### सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वाची निरीक्षणे

जामीन मंजूर करताना सर्वोच्च न्यायालयाने काही गंभीर टिप्पणी केली आहे. आरोपी गेल्या १८ महिन्यांपासून तुरुंगात आहेत. गुन्ह्यातील शिक्षेचा विचार करता, त्यांना अधिक काळ कोठडीत ठेवणे त्यांच्यावर अन्यायकारक ठरेल, असे म्हटले आहे. तसेच न्यायमूर्ती नागरत्ना यांनी पालकांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. "मुलांना चैनीसाठी पैसे आणि गाडीच्या चाव्या देणे अयोग्य आहे. पालकांना मुलांसाठी वेळ नसतो आणि ते त्याची भरपाई पैशांनी करतात, हे सामाजिक वास्तव चिंताजनक आहे," असे न्यायालयाने म्हटले. आरोपींना पुराव्यांशी छेडछाड न करण्याच्या आणि तपासात पूर्ण सहकार्य करण्याच्या अटीवर जामीन देण्यात आला आहे.

### रक्ताच्या नमुन्यांमध्ये छेडछाड केल्याचा आरोप

पोलिस तपासात असा आरोप करण्यात आला की अल्पवयीन आरोपीच्या वडिलांनी आणि त्यांच्या जवळच्या लोकांनी मिळून वैद्यकीय तपास प्रक्रियेत हस्तक्षेप केला. मद्यप्राशनाचा पुरावा नष्ट करण्यासाठी अल्पवयीन मुलाऐवजी इतर व्यक्तींचे रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. याच प्रकरणात एकूण 10 जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती उज्वल भुयान यांच्या खंडपीठीने याचिकाकर्ते तीन वर्षांहून अधिक काळ अंडरट्रायल कोठडीत असताना या प्रकरणात साक्षीदारांची संख्या वाढवण्यात काही अर्थ नाही असे म्हटले आहे. या प्रकरणात अद्याप १५९ साक्षीदारांची चौकशी होणे बाकी आहे.

सूद आणि मित्तल यांना गेल्या वर्षी १९ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आले होते. या दोघांच्या रक्ताचे नमुने अपघातावेळी कारमध्ये उपस्थित असलेल्या दोन अल्पवयीन मुलांच्या रक्ताचे नमुन्यांऐवजी तपासणीसाठी तसेच त्यांची अदलाबदल करण्यासाठी वापरण्यात आल्यानंतर ही अटक करण्यात आली होती. मुंबई उच्च न्यायालयाने सूद आणि मित्तल यांच्यासह इतर सहा जणांची याचिका गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात फेटाळून लावली होती.

19 मे 2024 रोजी पुण्यातील कल्याणीनगर परिसरात एका वेगवान पोर्शे कारने दुचाकीवरून जाणाऱ्या दोन तरुणांना जोरदार धडक दिली होती. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. तपासात समोर आले की अपघाताच्या वेळी कार 17 वर्षांचा अल्पवयीन मुलगा चालवत होता आणि तो मद्यधुंद अवस्थेत असल्याचा संशय होता.

---

# पुण्यातील सिंहगड डेंटल कॉलेजची मान्यता रद्द

**महाईन्यूज । पुणे**

**विद्यापीठ अधिनियमातील अटी व शर्तींचा भंग केल्याचा ठपका ठेवत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने (एमयुएचएस) पुण्यातील सिंहगड दंत महाविद्यालय आणि रुग्णालयावर मोठी कारवाई केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून या महाविद्यालयाच्या पदवी (बीडीएस) आणि पदव्युत्तर (एमडीएस) अभ्यासक्रमाची संलग्नता रद्द करण्यात आली आहे. शिक्षकांच्या थकीत वेतनाचा प्रश्न संस्थेने सोडवला नाही. परिणामी, कामबंद आंदोलनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याकडे विद्यापीठाने लक्ष वेधले आहे.**



### विद्यार्थ्यांचे अन्यत्र स्थलांतर

या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे राज्यातील इतर खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी स्थलांतर केले जाणार आहे. ही प्रक्रिया विद्यापीठ स्वतः राबविणार आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांचे पसंतीक्रम आणि गुणवत्ता लक्षात घेऊन कुलसचिवांमार्फत प्रवेश प्रक्रिया राबविली जाईल. सिंहगड दंत महाविद्यालयाचे संलग्नीकरण रद्द झाले असले, तरी आस्थापनेवरील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याची जबाबदारी संस्थेवरच राहील. ही संपूर्ण थकबाकी दिल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच महाविद्यालयाच्या भविष्यातील संलग्नीकरणाबाबत विचार केला जाईल, असे विद्यापीठाने ठरावात स्पष्ट केले आहे.

पुण्यातील सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे हे सिंहगड दंत महाविद्यालय आहे. महाविद्यालयातील ७८ शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या गाऱ्हाणे निवारण समितीकडे दाद मागितली होती. संबंधित कर्मचाऱ्यांचे मे २०१४ पासूनचे वेतन थकीत आहे. मध्यंतरी तीन वर्षांचे मूळ वेतन देताना संपूर्ण वेतनावर प्राप्तिकर वजा करण्यात आला, तसेच एकदा काही महिन्यांचे वेतन देऊन ते परत घेतले गेल्याची तक्रारही कर्मचाऱ्यांनी केली आहे. थकीत वेतनासाठी १० नोव्हेंबर २०२५ पासून कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केले. या काळात विद्यापीठाने वारंवार निर्देश देऊनही संस्थेने त्याचे पालन केले नाही. याबद्दल महाविद्यालयावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई देखील करण्यात आली होती.

या प्रकरणात विद्यापीठाने स्थापन केलेल्या त्रिसदस्यीय समितीने अहवाल सादर केला. आंदोलनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असून रुग्णालयीन सेवाही विस्कळीत झाल्याचे समोर आले आहे. या संदर्भात आरोग्य विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या उपस्थितीत बैठक पार पडली होती. सिंहगड टेक्निकल सोसायटीच्या संचालकांनी आठवडाभरात वेतन अदा करावे, संप मिटल्यानंतर विद्यार्थ्यांचे अतिरिक्त वर्ग घेऊन शैक्षणिक कामकाज नियमित करावे आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचा अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते.

# शहराच्या शाश्वत विकासासाठी आम्ही कटिबद्ध!

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांची भावना | महापौर रवि लांडगे, उपमहापौर पदी शर्मिला बाबर यांचा अर्ज

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासाचा संकल्प घेवून आम्ही काम करीत आहोत. महापालिका निवडणुकीपूर्वी गावकी-भावकीतील मतभेद दूर करुन एकोप्याने शहराच्या विकासात योगदान देण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला. विधानसभा निवडणुकीत झालेले मतभेद बाजूला ठेवून आम्ही महापालिका निवडणुकीत एकत्रितपणे काम करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी भूमिका भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका महापौरपदासाठी सत्ताधारी भारतीय जनता पार्टीकडून बिनविरोध नगरसेवक रवि लांडगे यांचा अर्ज भरण्यात आला. त्यानंतर उपमहापौरपदासाठी नगरसेविका शर्मिला बाबर यांचा अर्ज दाखल करण्यात आला.

यावेळी सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, चिंचवडचे आमदार शंकर जगताप, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष ॲड. नितीन लांडगे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, ज्येष्ठ नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेविका नम्रता लोंढे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, ज्येष्ठ नगरसेवक राजू मिसाळ, दक्षिण भारतीय आघाडीचे प्रमुख राजेश पिल्ले, नगरसेवक अभिषेक बारणे, माजी उपमहापौर केशव घोळवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवडून आलेले माझे सहकारी रवि बाबासाहेब लांडगे यांनी पक्षाच्या वतीने "महापौर"पदासाठी अर्ज दाखल केला आहे. भारतीय जनता पार्टीकडे पूर्ण बहुमत आहे. त्यामुळे त्यांची महापौरपदी निवड निश्चित आहे.

### कै. अंकुशराव लांडगे, कै. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली..!

शहराचे नेते दिवंगत कै. अंकुशराव लांडगे यांच्या विचारांनी आम्ही सर्वजण काम करीत आहोत. आज त्यांच्या कुटुंबातील सदस्याला शहराच्या प्रथम नागरिकपदाचा मान मिळतो आहे. ही खऱ्या अर्थाने अंकुशभाऊंना श्रद्धांजली ठरणार आहे. आगामी काळात पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक घटकाला न्याय देवून शाश्वत विकासाचे संकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांच्या माध्यमातून विधायक कार्य होईल, असा मला पूर्ण विश्वास आहे. महाराष्ट्राचे लोकनेते दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे भारतीय जनता पार्टी महापौर किंवा उपमहापौर निवडीबाबत कोणताही आनंदोत्सव साजरा करणार नाही. त्यामुळे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि भाजपा परिवारातील सदस्यांनी आनंदोत्सव साजरा न करता दिवंगत अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे अवाहनही आमदार लांडगे यांनी केले आहे.

# भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा शब्द अखेर खरा ठरला..!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**"पिंपरी-चिंचवड महापालिकेचा महापौर भाजपचाच असेल," असा ठाम विश्वास भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केला होता आणि अखेर तो प्रत्यक्षात उतरला आहे. भाजपकडून महापौरपदासाठी रवि लांडगे तर उपमहापौरपदासाठी शर्मिला बाबर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचा महापौर निश्चित झाला आहे. तसेच, शर्मिला बाबर यांचीही निवड निश्चित मानली जात आहे.**




भारतीय जनता पक्षाच्या वतीने पिंपरी चिंचवड शहराच्या महापौर पदासाठी रवी लांडगे आणि उपमहापौर पदासाठी शर्मिला बाबर यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यावेळी भाजपाचे नेते आमदार महेश लांडगे, चिंचवडचे आमदार शंकर जगताप, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, अमित गोरखे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, ज्येष्ठ नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेविका नम्रता लोंढे, ज्येष्ठ नगरसेवक राजू मिसाळ, नगरसेवक अभिषेक बारणे, माजी उपमहापौर केशव घोळवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सुमारे आठ महिन्यांपूर्वी शत्रुघ्न काटे यांनी भाजप शहराध्यक्षपदाची धुरा स्वीकारली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी शहरात संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर भर दिला आणि पक्षाची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी शहरात करण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम थेट महापालिका निवडणुकीच्या निकालात दिसून आला.

दरम्यान, अल्पावधीत शहर संघटन मजबूत करत निवडणुकीत भाजपला यश मिळवून देणारे नेतृत्व म्हणून शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची राजकीय वर्तुळात विशेष चर्चा होत आहे.

### शत्रुघ्न काटे यांचे पुन्हा "समर्पण"...

वास्तविक, महापौरपदासाठी तीव्र इच्छुक असलेले शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांना संधी मिळाली नाही. विशेष म्हणजे, 2017 मध्ये निवडून आल्यानंतर त्यांना महत्त्वाच्या पदावर संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, त्यांना पदापासून वंचित ठेवण्यात आले. विधानसभा निवडणुकीत इच्छुक असताना त्यांना तिकीट मिळाले नाही. त्यानंतर पक्षाने त्यांच्यावर शहराध्यक्षपदाची जबाबदारी दिली. समर्पित भावनेतून काम करणारे शत्रुघ्न काटे भाजपासाठी पुन्हा एकदा "किंगमेकर" ठरले आहेत. भाजपने महापालिका निवडणुकीत शहरात एकहाती सत्ता मिळवत नागरिकांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर महापौरपदावर भाजपचाच उमेदवार विराजमान होणार, हे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी ठामपणे सांगितले होते. आज उमेदवारी अर्ज दाखल होताच काटे यांचे शब्द खरे ठरले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड शहरात आरोग्य, शिक्षण, क्रीडा, पाणीपुरवठा आणि सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास सुरू आहे. हा विकासाचा वेग कायम ठेवण्याची जबाबदारी महापालिका सभागृह पार पाडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.



## भूमिका

# संसद, सत्य आणि सीमासुरक्षा!

**लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर धन्यवाद प्रस्तावावरील चर्चा ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून, देशाच्या सध्याच्या स्थितीवर, धोरणांवर आणि भविष्यातील दिशेवर मंथन करण्याची महत्त्वाची संधी असते.'**

मात्र या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांमुळे सभागृहात निर्माण झालेला गोंधळ हे संसदीय लोकशाहीपुढील काही मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित करणारे ठरले.



राहुल गांधी यांनी माजी लष्करप्रमुख मनोज मुकुंद नरवणे यांच्या लिखाणाचा संदर्भ देत डोकलाम आणि चीनच्या हालचालींबाबत चिंता व्यक्त केली. देशाच्या सीमांशी संबंधित कोणतीही बाब ही केवळ राजकीय मुद्दा नसून थेट राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित असते. अशा वेळी विरोधी पक्षाने प्रश्न उपस्थित करणे हे असंवैधानिक किंवा देशविरोधी ठरत नाही, तर ते लोकशाहीतील आवश्यक तपासणी (CHECKS AND BALANCES) मानले पाहिजे. सरकारच्या धोरणांवर प्रश्न विचारणे म्हणजे सैन्याचा किंवा देशाचा अपमान नव्हे, तर धोरणांची परिणामकारकता तपासण्याचा अधिकार आहे.

मात्र दुसरीकडे, संसदीय चर्चेची स्वतःची शिस्त आणि नियम आहेत. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी उपस्थित केलेला मुद्दा ज्या पुस्तकाचा उल्लेख केला जात आहे ते प्रकाशित आहे की नाही हा केवळ तांत्रिक आक्षेप नसून संसदीय प्रक्रियेचा भाग आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी हा संदर्भ अप्रकाशित पुस्तकाचा नसून मॅगझिनमधील लेखाचा असल्याचे सांगितले. संसदेच्या नियमांनुसार अप्रकाशित किंवा अप्रमाणित मजकुराचा थेट उल्लेख करणे योग्य ठरत नाही, हेही तितकेच सत्य आहे.

या संपूर्ण वादात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भूमिका प्रक्रियात्मकदृष्ट्या योग्य मानावी लागेल. संसदेची कार्यवाही नियमांनुसारच चालली पाहिजे, अन्यथा ती गोंधळात बदलण्याचा धोका असतो. मात्र प्रश्न असा आहे की, नियम पाळताना चर्चेचा गाभाच हरवतो आहे का? राष्ट्रीय सुरक्षेसारख्या संवेदनशील विषयांवर केवळ "संदर्भ अधिकृत आहे की नाही" यावर चर्चा थांबवली गेली, तर मूळ मुद्द्यावर प्रकाश कधी पडणार? याच पार्श्वभूमीवर समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी केलेली मागणी महत्त्वाची ठरते. चीनसारख्या शेजारी देशाशी संबंधित प्रश्न हे पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन चर्चिले गेले पाहिजेत. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील आरोप-प्रत्यारोपांमध्ये अशा गंभीर विषयांचे गांभीर्य कमी होणे देशाच्या हिताचे नाही.

राहुल गांधींच्या दीर्घ भाषणादरम्यान वारंवार आक्षेप घेण्यात येणे, माइक बंद करणे आणि अखेर सभागृह तहकूब करणे—ही दृश्ये संसदीय परंपरेस शोभणारी नाहीत. संसद ही संवादाची जागा आहे, संघर्षाची नव्हे. प्रश्न विचारले गेले पाहिजेत, उत्तरं दिली गेली पाहिजेत आणि गरज असल्यास तथ्यांच्या आधारे दुरुस्तीही झाली पाहिजे.

या घटनेतून एक स्पष्ट संदेश मिळतो. विरोधकांनी मुद्दे मांडताना अधिकृत, प्रमाणित आणि निर्विवाद संदर्भ वापरणे आवश्यक आहे. त्याचवेळी सत्ताधाऱ्यांनीही प्रत्येक प्रश्नाला नियमांच्या ढालीआड लपवण्याऐवजी स्पष्ट आणि ठोस उत्तर देण्याची तयारी दाखवली पाहिजे. राष्ट्रीय सुरक्षा हा विषय राजकीय फायद्यासाठी वापरण्याचा नाही, तर एकत्रितपणे गंभीरपणे हाताळण्याचा आहे.

लोकशाहीची ताकद गोंधळात नव्हे, तर सुसंस्कृत आणि अर्थपूर्ण चर्चेत असते. संसदेत सत्याचा शोध नियमांच्या चौकटीत झाला पाहिजे, पण नियम सत्य दडपण्यासाठी वापरले जाऊ नयेत. सीमारेषेवर उभ्या असलेल्या जवानाइतकेच संसदेत उभे राहून प्रश्न विचारणारे आणि उत्तर देणारे लोकशाहीचे रक्षक आहेत हे विसरता कामा नये.

## प्रासंगिक »

### खरे दुःख

***एक सोनार होता. त्याच्या दुकानासमोरच एका लोहाराचे दुकान होते. सोनार जेव्हा काम करत असे तेंव्हा सोनाराच्या दुकानातून हळू आवाज होत असे पण जेंव्हा लोहार काम करत असे तेंव्हा मात्र लोखंडाचे काम होत असल्याने मोठा आवाज होत असे.***

तो आवाज मोठा कर्णकर्कश असे. एके दिवशी सोनाराच्या दुकानातील एक सोन्याचा कण कसा कोण जाणे पण लोहाराच्या दुकानात जावून पडला. त्या सोन्याच्या कणाची भेट एका लोखंडाच्या कणाशी झाली. खूप दिवसांची ओळख असल्यासारखे ते एकमेकांशी बोलू लागले. सोन्याच्या कणाने लोखंडाच्या कणाला म्हंटले,"दादा, आपले दुःख तर खरे एकसमान आहे. दोघानाही आगीत तापवले जाते आणि हातोड्याने ठोकले जाते. मी तर बाबा चुपचाप हे सहन करतो, पण तुझे काय?" लोखंडाचा कण सोन्याच्या कणाकडे पाहून दुःखी स्वरात म्हणाला,"अरे ! तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. दोघानाही तापवणारी आग एकच आहे आणि ठोकणारा हातोडाहि एकाच धातूचा आहे.

तात्पर्य- आपल्या माणसांकडून होणारा त्रास हा कायमच दुःखदायक वाटतो.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला 2026-27 चा केंद्रीय अर्थसंकल्प हा विकासाच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल आहे. त्यांनी सलग नववा अर्थसंकल्प सादर करून इतिहास रचला.

# सकारात्मक आणि आव्हानात्मकही

याचा महाराष्ट्राला मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हाय-स्पीड रेल्वे, शहर आर्थिक क्षेत्र, 1 लाख कोटी शहरी आव्हान निधी, एमएसएमई प्रोत्साहन, गिग वर्कर्स सुरक्षा अशा प्रकारे लाभ मिळेल. गोव्याला आणि त्यामुळे शेजारी कोकणाला आयआयटी विस्तार, वैद्यकीय पर्यटन, नारळ योजना, मत्स्यव्यवसाय प्रोत्साहन योजना लाभदायी ठरेल. बेळगावला कृषी योजना, रेल्वे प्रकल्प. कोकण व पश्चिम महाराष्ट्राला बंदर जोडणी, काजू-कोकोआ योजना, जलमार्ग विकास यांचा फायदा होईल. एकूणच या भागात पायाभूत सुविधा, रोजगार, कृषी वृद्धीला चालना मिळेल. या अर्थसंकल्पात अनेक सकारात्मक घोषणा आहेत ज्या जागतिक आर्थिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी उपयुक्त ठरतील. जागतिक मंदी, महागाई आणि असमानतेच्या पार्श्वभूमीवर हा अर्थसंकल्प स्थिरता आणि दीर्घकालीन वाढीवर भर देतो. अर्थसंकल्पातील सकारात्मक पैलू प्रामुख्याने उत्पादन, पायाभूत सुविधा,



आरोग्य, शिक्षण आणि क्रिएटिव्ह क्षेत्रात दिसतात. अर्थसंकल्पाचा उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनावर जोर आहे. दुर्मीळ खनिजांसाठी रेअर अर्थ मॅग्नेट कॉरिडॉरची घोषणा ही एक मोठी सकारात्मक बाब आहे, जी इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर क्षेत्राला मजबूत करेल. यासाठी 40 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे, ज्यामुळे चीनवर अवलंबित्व कमी होईल आणि स्वदेशी उत्पादन वाढेल. कंटेनर उत्पादनासाठी 10 हजार कोटी आणि एमएसएमईसाठी 10 हजार कोटींचा विकास निधी छोट्या उद्योगांना दिलासा देणारा आहे, ज्यामुळे रोजगार निर्मिती होईल. पायाभूत सुविधांमध्ये 7 हाय-स्पीड रेल्वे कॉरिडोर (जसे मुंबई-पुणे-हैदराबाद, दिल्ली-वाराणसी) आणि 100 नवीन जलमार्गांची घोषणा ही अर्थव्यवस्थेला गती देईल. हे कॉरिडोर पुरवठा साखळी मजबूत करून निर्यात वाढवतील अशी अपेक्षा आहे. आरोग्य क्षेत्रात तीन नवीन एम्स, आयुर्वेद संस्था आणि बायोफार्मासाठी 10 हजार कोटींची गुंतवणूक ही कोविडनंतरच्या आव्हानांना उत्तर आहे. कॅन्सर आणि दुर्मीळ आजारांच्या 17 औषधांवरील आयात कर कमी करणे आणि 7 गंभीर आजारांसाठी कर कपात ही सामान्य नागरिकांसाठी दिलासादायक आहे. क्रिएटिव्ह आणि कौशल्य विकासावर भर देणे हे आणखी एक सकारात्मक वैशिष्ट्या. ऑरेंज इकॉनॉमी (एव्हीजीसी) साठी मुंबईतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीज आणि 15,000 शाळा-महाविद्यालयांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब्सची स्थापना ही तरुणांना 20 लाख रोजगार देईल.

## ।। अभंगवाणी ।।



त्रिगुण असार निर्गुण हें सार ।
सारासार विचार हरिपाठ ॥१॥

सगुण निर्गुण गुणाचें अगुण ।
हरिवीणें मन व्यर्थ जाय ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंबई महापालिकेत मनसेचा भाजपला पाठिंबा?

## महापौर पदासाठी भाजप सक्रिय; मनसे पाठिंब्याबाबत राजकीय चर्चांना उधाण

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबई महानगरपालिकेमध्ये महापौर पदासाठी भाजपने मोठी खेळी खेळण्यास सुरुवात केली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेतल्यानंतर महायुतीचे संख्याबळ १२१ वर पोहोचले आहे, मात्र हे संख्याबळ अधिक वाढवण्यासाठी मनसेच्या ६ नगरसेवकांचा पाठिंबा मिळवण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे समोर आले होते. यावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्पष्टीकरण दिले आहे.**



भाजपने नुकतीच गणेश कणक यांची गटनेतेपदी नियुक्ती केली असून, महापौर पदाचा उमेदवार निवडून आणण्यासाठी भाजपची ही खरी कसोटी असणार आहे. जरी युतीकडे बहुमत असले, तरी आपले पारडे अधिक जड करण्यासाठी मनसेला सोबत घेण्याचे प्रयत्न भाजपकडून केले जात आहेत. याआधी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत मनसेने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा दिला होता, त्यामुळे आता मुंबईतही तशीच पुनरावृत्ती होऊन मनसे भाजपच्या उमेदवाराला पाठिंबा देणार का, अशी चर्चा सरू होती.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मात्र भाजपला पाठिंबा देणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. राज ठाकरे म्हणाले, "भाजपला पाठिंबा देणार असं मी बोललोय का? असा कोणताही विषय झाला नाही. भारतीय जनता पक्षासोबत जाण्यासंदर्भात कुठल्याही पद्धतीची चर्चा झाली नाही," असे म्हणत भाजपला पाठिंबा देण्याचा मुद्दा राज ठाकरे यांनी खोडून काढला.

मुंबई महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा गटनेता होणार असल्यामुळे महापालिकेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांना आपला सहभाग नोंदवता येणार आहे. विशेष म्हणजे महापौरांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या गटनेत्यांच्या बैठकीत मनसेला आपले मत मांडता येणार आहे. मुंबई महापालिकेच्या 2017 मध्ये झालेल्या निवडणुकीत मनसेचे सात नगरसेवक निवडून आले होते. परंतु मनसे नगरसेवकांचा गट स्थापन होण्याआधीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने त्यांचे सहा नगरसेवक पळवले. त्यामुळे मनसेला आपला स्वतंत्र गट स्थापन करता आला नाही. परिणामी महापालिकेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होता आले नाही. मात्र यावेळी शिवसेना (उबाठा) यांच्या पाठिंब्यामुळे मनसेचे 6 नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे मनसेचा गटनेता होणार आहे.


### महापौर पदावरून शिंदे-भाजपात मतभेद

मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि भारतीय जनता पक्ष एकत्र आले होते. भाजपाला ८९ आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाला २९ जागा मिळाल्या असून महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. तरीही महापौर पदावरून दोन्ही पक्षांतील चर्चा अद्याप संपलेल्या नाहीत. त्यातच, महापौर पदासाठी भाजपाने हट्ट धरल्याने सर्व शक्यता पडताळून पाहिल्या जात आहेत. त्यामुळे दोन्ही पक्ष इतर नगरसेवकांचा पाठिंबा मिळण्यासाठी प्रयत्नशील आहेत. भाजपानेही मनसेशी संपर्क साधला असल्याची चर्चा आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत मनसेने शिंदे गटाला पाठिंबा दिल्याने आता मुंबईतही मनसे भाजपाला पाठिंबा देईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, ही शक्यता खुद्द राज ठाकरेंनीच फेटाळून लावली आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या शहरातील महापालिकेत ठाकरे महापौर

**महाईन्यूज । नागपूर**

**महापौरपदाच्या नावावरून आता सारे तर्कवितर्क व चर्चांना विराम मिळाला असून दक्षिण नागपुरातील प्रभाग २८ मधील नगरसेविका निता ठाकरे यांची महापौरपदी निवड निश्चित झाली आहे. त्यांनी आज महापौरपदाच्या निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल झाले. त्यांच्यासोबत उपमहापौरपदासाठी ऐन वेळेवर लिला हाथीबेड यांनी भाजपतर्फे उमेदवारी अर्ज दाखल केला. महापौरपदासाठी निवडणूक येत्या ६ फेब्रुवारी रोजी सुरेश भट सभागृहात आयोजित पहिल्या विशेष सभेदरम्यान होणार आहे.**



महापौरपदाच्या निवडणुकीसाठी आज अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया महापालिकेतील स्थायी समिती सभागृहात पार पडली. निता ठाकरे यांनी महापौरपदासाठी मनपा सचिवांकडे दोन नामांकन अर्ज दाखल केले. लिला हाथीबेड यांनीही उपमहापौरपदासाठी दोन अर्ज दाखल केले. अर्ज दाखल करताना शहर भाजपाध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार मोहन मते, आमदार कृष्णा खोपडे, गटनेते बाल्या बोरकर, नगरसेवक पिंटू झलके यांच्यासह इतर नगरसेवक, नगरसेविका व अधिकारी उपस्थित होते.

निता ठाकरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताच त्या शहराच्या ५५ व्या व आठव्या महिला महापौर होणार असल्याचे स्पष्ट झाले. निता ठाकरे एमए बीएड झाल्या असून गृहिणी आहेत. त्या यापूर्वी २००२, २००७, २०१२ मध्ये नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या. मागील २०१७ मधील निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला होता. आता त्या प्रभाग २८ मधून निवडून आल्या.

याशिवाय त्यांनी भाजपच्या पदाधिकारी म्हणूनही विविध जबाबदाऱ्या पार पडल्या. त्या महिला आयोगाच्या सदस्याही होत्या. त्यांच्या उमेदवारीसाठी दक्षिण नागपूरचे आमदार मोहन मते यांनी आग्रह धरला होता. मागील आठवड्यात शुक्रवारी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चर्चेत त्यांचे नाव अंतिम करण्यात आले. मात्र नावाबाबत कमालीची गोपनीयता बाळगण्यात आली होती. आज अर्ज दाखल करण्यापर्यंत महापौरपदाच्या नावाबाबत साशंकता होती. दुपारी अर्ज दाखल केल्यानंतर त्या शहराच्या महापौर होणार असल्याचे स्पष्ट झाले.

### उपमहापौराची नाट्यमय निवड

उपमहापौरपदासाठी प्रभाग १९ मधील ज्येष्ठ नगरसेवक ॲड. संजय बालपांडे यांचे नाव निश्चित करण्यात आले होते. त्यांना उमेदवारी भरण्यास सांगण्यात आले. परंतु त्यांनी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन विनम्रतेने उपमहापौरपद स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे ऐन वेळेवर प्रभाग २९ मधील लिला हाथीबेड यांना तयार करण्यात आले. त्यामुळे आता दक्षिण नागपूरला महापौरपदासोबतच व उपमहापौरपदही देण्यात आले.

### ठाकरेविरुद्ध ठाकरे लढत


कॉंग्रेसचे ३४ सदस्य असून महापौरपदाची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. कॉंग्रेसकडून सोमवारी प्रभाग ११ मधील स्नेहल ठाकरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे आता निता ठाकरेविरुद्ध स्नेहल ठाकरे अशी लढत राहणार आहे. कॉंग्रेसने उपमहापौरपदासाठी प्रभाग ९ मधील विवेक निकोसे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला.

# राजस्थानच्या साध्वी प्रेम बाईसांचा गूढ मृत्यू

## आक्षेपार्ह व्हिडीओचं प्रकरण काय? सोशल मीडिया पोस्टची चर्चा का?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**राजस्थानच्या जोधपूर या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या आणि प्रसिद्ध कथावाचक साध्वी प्रेम बाईसा यांचं नाव त्यांच्या मृत्यूनंतर चर्चेत आलं आहे. एक व्हायरल व्हिडिओ समोर आला आहे. ज्यानंतर प्रेम बाईसांवर त्या व्हिडीओचा तणाव आला आणि त्यांचं निधन झालं. या सगळ्या घटनांची साखळी पोलीस जोडत आहेत. त्यांचा मृत्यू नैसर्गिक आहे की हत्या याचाही तपास केला जातो आहे.**



**साध्वी प्रेम बाईसा यांचं बालपण कसं होतं?**

साध्वी प्रेम बाईसा यांचा जन्म बाडमेर जिल्ह्यातील परेऊ या ठिकाणी झाला. त्यांच्या कुटुंबातही धार्मिक आणि प्रवचनाची परंपरा होती. लहानपणापासूनच त्यांना अध्यात्माची गोडी लागली. वयाच्या दहाव्या वर्षापासूनच त्यांचा ओढा अध्यात्माकडे मोठ्या प्रमाणावर वाढला. ज्यानंतर त्या साध्वी झाल्या आणि कथा वाचन, प्रवचन करु लागल्या. त्यांचे गुरु आणि त्यांचे वडील महंत वीरमनाथ यांच्या शिष्य म्हणून त्या भजन-किर्तन करत असत.

**सोशल मीडियावर कथा वाचनाचे व्हिडीओ व्हायरल**

मागील काही वर्षांपासून सोशल मीडियावरही प्रेम बाईसा या प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणावर वाढली होती. त्यांच्या भजनाचे, कथांचे व्हिडीओ व्हायरल होत असत. याच सोशल मीडियावर त्यांचा एक व्हिडीओ आला आणि तोच व्हिडीओ त्यांच्या तणावाचं कारण बनला.

**'त्या' व्हायरल व्हिडीओचं प्रकरण काय?**

साध्वी प्रेम बाईसा यांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला. हा व्हिडीओ २०२५ चा आहे असं सांगण्यात आलं. या व्हिडीओ साध्वी प्रेम बाईसा या पलंगावर झोपलेल्या असतात. भगवी वस्त्रं घातलेला एक साधू तिथे येतो. त्या त्याला मिठी मारतात आणि पुढे अश्लील चाळे सुरु होतात असा हा व्हिडीओ आहे.

### साध्वी प्रेम बाईसा कोण?

साध्वी प्रेम बाईसा या धार्मिक कथा वाचक होत्या. गेल्या काही वर्षांपासून साध्वी प्रेम बाईसा या भागवत कथा, भजन-किर्तन आणि धार्मिक प्रवचनांमध्ये त्यांचा वेळ घालवत असतं. सनातन धर्माचा प्रचार आणि प्रसार हे त्यांचं प्रमुख कार्य होतं. ग्रामीण भागांमध्ये आणि खेडेगावांमध्ये राहणारे लोक त्यांच्या कथा वाचनाला, प्रवचनाला आवर्जून उपस्थित राहात असत.

### साध्वी प्रेम बाईसांचं स्पष्टीकरण काय होतं?

साध्वी प्रेम बाईसांनी व्हायरल व्हिडीओबाबत स्पष्टीकरण दिलं होतं. माझा व्हिडीओ जो पोस्ट करण्यात आला आहे तो बनावट आणि एडिटेड आहे. या व्हायरल क्लिपमध्ये फेरफार करण्यात आले आहेत. चुकीच्या पद्धतीने आणि आक्षेपार्ह वाटेल असाच हा व्हिडीओ जाणीवपूर्वक तयार करण्यात आला आहे. माझ्याकडे व्हिडीओच्या बदल्यात पैसेही मागितले गेले असाही दावा त्यांनी केला होता. तसंच या प्रकरणात मी पोलिसात तक्रार दिल्याचंही साध्वी प्रेम बाईसा यांनी म्हटलं होतं.

# बैठकीतून तडकाफडकी बाहेर पडत ममता बॅनर्जींचा आरोप

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची भेट घेऊन मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रियेबाबत तक्रार केली. ही भेट जवळपास सुमारे ९० मिनिटे चालली. परंतु, या बैठकीत निवडणूक आयुक्तांनी गैरवर्तन केल्याचा दावा ममता बॅनर्जी यांनी केला. बैठक अर्ध्यावर सोडून त्यांनी बाहेर येऊन माध्यमांशी संवाद साधत निवडणूक आयोग आणि आयुक्तांवर टीका केली.**



बैठकीतून बाहेर पडताना बॅनर्जी यांनी पत्रकारांना सांगितले की, "बंगालमध्ये किरकोळ स्पेलिंग बदल आणि शीर्षक बदलांमुळे मतदारांची नावे रद्द केली जात आहेत. त्यांनी प्रथम लोकांची नावे काढून टाकली. निवडणूक आयुक्त हे भाजपाचे आयटी सेल आहेत. तुम्ही म्हणता की ही लोकशाही आहे? बॅनर्जी आणि बंदोपाध्याय, मुखर्जी आणि मुखोपाध्याय, किंवा चॅटर्जी आणि चट्टोपाध्याय अशी स्पेलिंगमधील फरकांमुळेही नावे वगळली जात आहेत." ५८ लाख मतदारांची नावे कोणत्याही चौकशीशिवाय काढून टाकण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. ममता बॅनर्जी यांनी आरोप केला की या तपासणीदरम्यान बूथ-स्तरीय अधिकाऱ्यांवर (बीएलओ) दबाव आणला जात होता. तसंच, अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याकांना जास्त प्रमाणात त्रास होत आहे. "अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याकांना का लक्ष्य केले जात आहे? ते मानव नाहीत का?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**'भाजपाशासित आसाममध्ये फेरतपासणी का नाही?'**

SIR प्रक्रिया निवडणुकांच्या तोंडावर का राबविली जात आहे. आसाममध्ये भाजपाचं सरकार आहे, तिथे ही प्रक्रिया का राबविली नाही?तुम्ही बंगाल, केरळ आणि तामिळनाडूला लक्ष्य करत आहात आणि भाजपाशासित राज्य सोडत आहात", असाही आरोप त्यांनी केला. बॅनर्जी यांनी असा दावा केला की इतर राज्यांना जमिनीच्या नोंदी आणि माध्यमिक प्रमाणपत्रे यासारख्या कागदपत्रांचा वापर करण्याची परवानगी असताना, बंगालसाठी नियम बदलण्यात आले.

### निवडणूक अधिकाऱ्यांनी फेटाळला आरोप

दरम्यान, या बैठकीशी संबंधित सूत्रांनी सांगितलं की, तृणमूल काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आयुक्तांविरोधात धमकीची भाषा वापरली. या तपासणीच्या कामात गुंतलेल्या अधिकाऱ्यांनाही त्यांनी धमकावलं. त्यामुळे कायदा हातात घेणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा या अधिकाऱ्यांनी दिला, असं वृत्त इंडिया टुडेने दिलं आहे.

### निवडणूक आयुक्तांनी गैरवर्तन केले

"हे निवडणूक आयुक्त खूप अहंकारी आहेत. आमच्याशी गैरवर्तन झाले आहे. आमचा अपमान झाला आहे", असं म्हणत ममता बॅनर्जी बैठकीतून बाहेर पडल्या. शिष्टमंडळ न्याय मागण्यासाठी आले होते असा दावा करून बॅनर्जी म्हणाल्या, "मुख्य निवडणूक आयुक्त आम्हाला खोटे बोलले. आम्ही येथे न्यायासाठी आलो होतो पण आमच्यावर अन्याय झाला."

# ‘कॉकटेल-2’वर मोठी बातमी!



बहुचर्चित ‘कॉकटेल २’ बाबत दिग्दर्शकाने मोठी अपडेट दिली असून, या घोषणेनंतर चित्रपटाशी संबंधित कलाकारांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. शाहिद कपूर आणि रश्मिका मंदान्ना यांनी या खास क्षणाचा आनंद साजरा केल्याचं बोललं जात असून, चाहत्यांमध्येही चित्रपटाबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. बॉलिवूडमधील बहुचर्चित चित्रपट ‘कॉकटेल’ चा दुसरा भाग म्हणजेच ‘कॉकटेल २’ सध्या जोरदार चर्चेत आहे. या चित्रपटाबाबत दिग्दर्शकाने नुकतीच एक महत्त्वाची अपडेट दिली असून, त्यानंतर चित्रपटातील कलाकारांनी कक कापून आनंदोत्सव साजरा केला. शाहिद कपूर, क्रिती सेनॉन आणि रश्मिका मंदान्ना यांनी सेलेब्रेशन केलेले फोटो एक्स अकाऊंटवर व्हायरल होत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ‘कॉकटेल २’ च्या शूटिंगचं काम पूर्ण झालं आहे. यानंतर शाहिद आणि रश्मिका, क्रिती यांनी सेटवर केक कापून सेलिब्रेट केले. होमी अदजानिया दिग्दर्शित 'कॉकटेल २' यावर्षी २०२६ मध्ये रिलीज केले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. शाहिद कपूर, रश्मिका मंदाना, क्रिती सेनॉन यांचा बहुप्रतीक्षित चित्रपटाची अधिकृत रिलीज डेटची अधिकृत घोषणा झालेली नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ‘कॉकटेल २’मधील रश्मिका मंदान्ना आणि शाहिदची फ्रेश जोडी मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. होमी अदजानियाने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केलीय. त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलंय- 'कॉकटेल २ चे शूटिंग पूर्ण झाले आहे. कदाचित मी पक्षपाती आहे, पण हे थोडे खास वाटते. माझ्या टीम आणि कलाकारांना खूप प्रेम, जे मला आणि माझ्या कृती सहन करतात. तुम्हाला खूप प्रेम.'

# बॉलिवूड देसी गर्लची साऊथ चित्रपटसृष्टीत एंन्ट्री!



प्रसिद्ध दिग्दर्शक एस. एस. राजामौली लवकरच एक मोठा ॲक्शन चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. राजामौली यांनी आजवर अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. त्यांचे नाव केवळ साऊथ चित्रपट इंडस्ट्रीपुरते मर्यादित नसून ते आता ग्लोबली पोहचले आहेत. ते त्यांच्या ‘ग्लोबट्रोटर’ चित्रपटामुळे चर्चेत आले आहेत. या चित्रपटाची गेल्या अनेक दिवसांपासून जोरदार चर्चा सुरू होती. चित्रपटाचा पहिला लूक समोर आला असून, पहिल्या पोस्टरमधून बॉलिवूडची देसी गर्ल प्रियांका चोप्राचा लूक रिव्हील करण्यात आला आहे. या चित्रपटात साऊथ सुपरस्टार महेश बाबू आणि बॉलिवूडची देसी गर्ल प्रियंका चोप्रा एकत्र स्क्रिन शेअर करताना दिसणार आहेत. या दोघांनाही मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते आतुर झाले आहेत. बॉलिवूडमध्ये एंन्ट्री केल्यानंतर प्रियंकांने हॉलिवूड इंडस्ट्रीमध्ये आपल्या नावाची छाप पाडली आहे. आता ती साऊथ इंडस्ट्रीत ‘ग्लोबट्रोटर’ चित्रपटाद्वारे पदार्पण करण्यासाठी सज्ज झाली आहे. नुकताच चित्रपटातील प्रियांका चोप्राचा फर्स्ट लूक समोर आला आहे. “जागतिक स्तरावर भारतीय चित्रपटसृष्टीला नवी ओळख देणारी महिला...देसी गर्लचे (प्रियंका चोप्रा) पुन्हा स्वागत आहे! मंदाकिनीच्या असंख्य छटा जगानं पाहाव्यात, यासाठी मी उत्सुक आहे. अशा शब्दांत एस.एस.राजामौली यांनी प्रियांका चोप्राचे कौतुक पोस्टर शेअर करत केले आहे. प्रियांकाने देखील तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर ‘ग्लोबट्रोटर’ चित्रपटातील फर्स्ट लूक शेअर केला आहे. पोस्टमध्ये प्रियांका चोप्राचा डॅशिंग लूक दिसत आहे. पिवळी साडी, हातात बंदूक आणि पायात कोल्हापूरी चप्पल घालून प्रियांका ॲक्शन अवतारात दिसत आहे.

# ‘फिल्म इंडस्ट्रीत महिलांची एक्सपायरी डेट असते’...



अभिनेत्री मोना सिंह सध्या ‘बॉर्डर 2’ या चित्रपटाच्या यशामुळे चर्चेत आहे. लवकरच ती तिच्या लोकप्रिय वेब सीरिज ‘कोहरा’च्या दुसऱ्या सीझनमध्येही दिसणार आहे. या सीरिजमध्ये मोना एका पोलीस अधिकाऱ्याची महत्त्वाची भूमिका साकारत आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने फिल्म इंडस्ट्रीतील वयाचा मुद्दा आणि महिलांना मिळणाऱ्या भूमिका याबद्दल स्पष्ट मत मांडलं आहे. पीटीआयशी बोलताना मोना सिंह म्हणाली की, तिने कधीही स्क्रीनवरील वयाची चिंता केली नाही. “मी ४० वर्षांची असूनही ५०-६० वर्षांच्या भूमिका साकारते. लोक मला विचारतात, तुम्ही स्क्रीनवर इतक्या वयस्क का दिसता? पण मला त्याचा फरक पडत नाही. मी कोण आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. मला काहीच सिद्ध करायचं नाही, म्हणून मी अशा भूमिका स्वीकारते,” असं ती म्हणाली. मोना सिंहने इंडस्ट्रीतील दुहेरी निकषांवरही भाष्य केलं. “फिल्म इंडस्ट्रीत असं मानलं जातं की महिलांची एक एक्सपायरी डेट असते. हे खूप दुःखद आहे. ६० वर्षांचे पुरुष अजूनही रोमँटिक भूमिका करतात, पण महिलांना तशी संधी दिली जात नाही,” असं ती स्पष्टपणे म्हणाली. ‘बॉर्डर 2’ या चित्रपटात मोना सिंहने सनी देओल यांच्या पत्नीची भूमिका साकारली असून, तिच्या अभिनयाचं कौतुक होत आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत असून अवघ्या सहा दिवसांत २१३ कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे. दरम्यान, ‘कोहरा 2’ मध्ये मोना धनवंत कौर या पात्राच्या भूमिकेत दिसणार असून, ही सीरिज ११ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे.

# ICC जिरवणार पाकिस्तानची खोड!

## येत्या ४८ तासांत PCB वर कोसळणार निर्बंधांची कुऱ्हाड

**महाईन्यूज । दुबई**

**टी-२० विश्वचषकातील भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याच्या पाकिस्तान सरकारच्या निर्णयानंतर, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (ICC) आता ॲक्शन मोडमध्ये आली आहे. 'एनडीटीव्ही'ने दिलेल्या वृत्तानुसार, पुढील ४८ तासांत आयसीसीची एक उच्चस्तरीय आपत्कालीन बैठक बोलावण्यात आली असून, यामध्ये पाकिस्तान क्रिकेट बोर्डावर (PCB) कठोर निर्बंध लादण्याबाबत चर्चा होण्याची दाट शक्यता आहे.**

पाकिस्तान सरकारने आपल्या संघाला १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये भारताविरुद्ध होणाऱ्या सामन्यात खेळण्यास मनाई केली आहे. सलमान अली आघाच्या नेतृत्वाखालील हा संघ विश्वचषकातील इतर सर्व सामन्यांमध्ये मात्र खेळणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. आपल्याला हवे तेच सामने खेळण्याच्या पाकिस्तानच्या या भूमिकेमुळे आयसीसी (ICC) प्रचंड संतापली आहे. या निर्णयामुळे भविष्यात जागतिक क्रिकेटमध्ये मोठे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

आयसीसी केवळ आर्थिक दंड लावून थांबणार नाही, तर पाकिस्तानला जागतिक क्रिकेटपासून एकाकी पाडण्याची तयारी सुरू आहे.




### असे आहे पाकिस्तानचे वेळापत्रक

ऑस्ट्रेलियाला मायदेशात ३-० ने धूळ चारल्यानंतर पाकिस्तानचा संघ फॉर्मात आहे. त्यांचा संघ मंगळवारी (दि. ३) श्रीलंकेला रवाना होईल. विश्वचषकात त्यांचा पहिला सामना ७ फेब्रुवारीला नेदरलँड्सविरुद्ध, १० फेब्रुवारीला अमेरिकेविरुद्ध आणि १८ फेब्रुवारीला नामिबियाविरुद्ध कोलंबोच्या सिंहली स्पोर्ट्स क्लब मैदानावर पार पडेल.

### PCBला कोणत्या कारवाईचा सामना करावा लागू शकतो?

- आर्थिक फटका : आयसीसीकडून मिळणाऱ्या वार्षिक महसुलात मोठी कपात.
- पीएसएलला (PSL) फटका : परदेशी खेळाडूंना पाकिस्तान सुपर लीगमध्ये खेळण्यासाठी लागणारे 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) रोखले जाण्याची शक्यता.
- निलंबन : अत्यंत टोकाच्या परिस्थितीत, पाकिस्तानला संपूर्ण टी-२० विश्वचषकातूनच निलंबित करण्याचा पर्यायही आयसीसीसमोर खुला आहे.

### वादाची पार्श्वभूमी

सुरक्षेच्या कारणास्तव बांगला देशने भारतात खेळण्यास नकार दिल्यानंतर त्यांना स्पर्धेतून डच्चू देण्यात आला होता. तेव्हापासून आयसीसी आणि पीसीबी यांच्यातील तणाव वाढत आहे. पाकिस्तान सरकारने रविवारी (दि. २) सोशल मीडियाद्वारे आपला अंतिम निर्णय जाहीर करून सर्व चर्चांना पूर्णविराम दिला.

# मुंबईचा संघ रणजी ट्रॉफीच्या क्वार्टर फायनलमध्ये!

**महाईन्यूज । मुंबई**

**रणजी करंडक २०२५-२६ च्या साखळी फेरीचा टप्पा रविवारी संपन्न झाला. चारही एलिट गटांमध्ये सात फेऱ्यांतील सामने पार पडल्यानंतर आठ संघांनी उपांत्यपूर्व फेरीत (क्वार्टर फायनल) प्रवेश निश्चित केला. गतविजेता विदर्भ संघ स्पर्धेतून बाहेर झाला आहे. तर मुंबईचा संघ पुढच्या फेरीत पोहोचला आहे. या उपांत्यपूर्व फेरीचं वेळापत्रक कसं असेल जाणून घेऊया.**




गतविजेत्या विदर्भाला साखळी फेरीतच गाशा गुंडाळावा लागला. ३१ गुण आणि चार विजय असूनही विदर्भाला पुढे जाता आलं नाही. उत्तर प्रदेशविरुद्ध विजय मिळवत सहा गुण मिळवूनही, मागील फेरीत आंध्र प्रदेशकडून झालेल्या पराभवाची किंमत विदर्भाला मोजावी लागली. आंध्र प्रदेश आणि झारखंडसोबत ३१ गुण समान असतानाही, बोनस गुणांच्या कमी विजयांमुळे (पहिला टाय-ब्रेकर) विदर्भ तिसऱ्या स्थानावर गेला.

ब गटात महाराष्ट्रावर विजय मिळवत मध्य प्रदेश अव्वल स्थानावर राहिला. त्याच गटातून दुसरा संघ म्हणून कर्नाटकने अखेरच्या क्षणी पात्रता मिळवली. पंजाबविरुद्धच्या थरारक विजयामुळे कर्नाटकने सौराष्ट्राला पिछाडीवर टाकलं. देवदत्त पडिक्कलच्या नाबाद १२० धावांच्या खेळीच्या बळावर कर्नाटकने अखेरच्या दिवशी केवळ २८ षटकांत २५० धावांचं लक्ष्य सहज पार केलं.

क गटात तब्बल ३६ गुणांसह बंगालने अव्वल स्थान पटकावलं, तर उत्तराखंडने त्यांच्यामागे राहून पात्रता मिळवली. शेवटच्या एलिट गटातून विक्रमी वेळेस रणजीचं जेतेपद पटकावणारा मुंबई आणि जम्मू-काश्मीर यांनी उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. अत्यंत निराशाजनक कामगिरीनंतर केवळ एक गुण मिळवू शकलेल्या नागालँड संघाला पुढील हंगामात पुन्हा प्लेट गटात जावं लागत आहे.

### रणजी करंडक २०२५-२६ बाद फेरीचे संपूर्ण वेळापत्रक

- उपांत्यपूर्व फेरी (क्वार्टर फायनल)
  ६ ते १० फेब्रुवारी २०२६
  क्वार्टर फायनल १: झारखंड विरुद्ध उत्तराखंड
  क्वार्टर फायनल २: मध्य प्रदेश विरुद्ध जम्मू-काश्मीर
  क्वार्टर फायनल ३: बंगाल विरुद्ध आंध्र प्रदेश
  क्वार्टर फायनल ४: मुंबई विरुद्ध कर्नाटक
- उपांत्य फेरी
  १५ ते १९ फेब्रुवारी २०२६
  पहिली उपांत्य फेरी: क्वार्टर फायनल १ चा विजेता विरुद्ध क्वार्टर फायनल ४ चा विजेता
  दुसरी उपांत्य फेरी: क्वार्टर फायनल २ चा विजेता विरुद्ध क्वार्टर फायनल ३ चा विजेता
- रणजी ट्रॉफी अंतिम सामना
  २४ ते २८ फेब्रुवारी २०२६
- उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरलेले संघ
  आंध्र प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश, सौराष्ट्र, बंगाल, उत्तराखंड, मुंबई आणि जम्मू-काश्मीर

स्मार्ट PCMC SMART CITY

epaper.mahaenews.com

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।

दि. 3 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### राजकीय स्पर्धा बाजुला ठेवून रवि लांडगे यांना “महापौरपदी” संधी

# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा आमदार महेश लांडगे यांचा “आदर्श”...

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने बहुमत मिळवले. त्यानंतर आता महापौर- उपमहापौर कोण होणार? याबाबतची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. अखेर भाजपाच्या प्रदेश नेतृत्वाने महापौरपदासाठी भोसरीतील बिनविरोध नगरसेवक रवि लांडगे यांच्या नावावर, तर उपमहापौर पदासाठी पिंपरीतील विजय उर्फ शितल शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे.**

## आमदार महेश लांडगे यांचा आदर्श...

- विधानसभा निवडणुकीत रवि लांडगे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात प्रवेश केला होता. आमदार महेश लांडगे यांच्या विरोधात निवडणुकीसाठी इच्छुक असल्याचा दावा केला होता. विधानसभा निवडणुकीनंतर आमदार लांडगे यांनी गावकी-भावकी एकत्र करण्याचा प्रयत्न केला.
- त्याला महानगरपालिका निवडणुकीत मूर्त स्वरुप मिळाले. रवि लांडगे भाजपात स्वगृही परतले. त्यानंतर निवडणुकीतील विजयानंतर पहिले महत्त्वाचे पद कै. अंकुशराव लांडगे यांच्या कुटुंबियांमध्ये देण्याचा मोठेपणा दाखवला.
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आता रवि लांडगे यांनी महापौरपदासाठी अर्ज दाखल केला आहे. भाजपाचे संपूर्ण बहुमत आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.
- यामुळे गावकी-भावकी एकत्रिकरणावर शिक्कामोर्तब झाले असून, कथित मतभेदांना पूर्णविराम देत शहराच्या विकासाच्या मुद्यावर महेश लांडगे यांनी राजकीय आदर्श निर्माण केला आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेचा नव्या महापौरपदाची निवड शुक्रवारी (दि. 6) होणार आहे. त्या दिवशी महापालिकेची पहिली विशेष सर्वसाधारण सभा आहे. त्यावेळी महापौर आणि उपमहापौर यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब होणार आहे. तत्पूर्वी, सोमवारी (दि. 2) उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आले.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी महापौर व उपमहापौर या दोन महत्त्वाच्या पदांसाठी नामनिर्देशन पत्र शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांना पाठवले आहे. त्यामध्ये महापौरपदासाठी रवि लांडगे आणि उपमहापौरपदासाठी शितल उर्फ विजय शिंदे यांच्या नावाचा उल्लेख आहे. यानुसार पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश प्रदेशाध्यक्षांनी दिले आहेत.







पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौरपद खुला होताच शहराच्या राजकारणात एकच नाव ठामपणे पुढे येत आहे ते म्हणजे भाजपाचे दोनवेळा बिनविरोध निवडून आलेले नगरसेवक रवि लांडगे. भोसरीतील प्रभाग क्रमांक ६ मधून २०१७ आणि २०२६ असे सलग दुसऱ्यांदा रवि लांडगे हे बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यांचे चुलते कै. अंकुशराव लांडगे हे भाजपचे माजी शहराध्यक्ष होते. त्यांनी पिंपरी-चिंचवडवर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व असताना भाजपाला उभारी दिली होती.

त्या विपरीत राजकीय परिस्थितीत आणि कठीण काळात कै. अंकुशराव लांडगे यांनी भाजपचे दोन अंकी नगरसेवक निवडून आणत शहरातील राजकीय गणित बदलण्याची मुहूर्तमेढ रोवली होती.

## शत्रुघ्न काटे, राहुल कलाटे, नवनाथ जगताप यांचा प्रतिक्षाच...







महापौरपदासाठी भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, नगरसेवक राहुल कलाटे आणि नवनाथ जगताप तीव्र इच्छुक होते. मात्र, त्यांना आणखी प्रतिक्षा करावी लागणार आहे. कारण, चिंचवडमधून कोणाला महापौरपदी संधी द्यायची यावर शेवटपर्यंत एकमत झाले नाही, असे समजते. महापौरपदाचा कार्यकाळ अडीच वर्षांचा आहे. त्यामुळे भाजपाकडून पाच वर्षांच्या काळात किमान 2 इच्छुकांना महापौरपद मिळू शकते. किंबहुना, पक्षश्रेष्ठींनी ठरवल्यास सदर कार्यकाळ कमी करुन जास्तीच्या इच्छुकांना संधी देण्याची भूमिका घेतली जाण्याची शक्यता आहे. आता स्थायी समिती सभापतीसारख्या महत्त्वाच्या पदावर कोणाला संधी मिळणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुणे-लोणावळा प्रवाशांच्या प्रश्नांकडे रेल्वेचे दुर्लक्ष

## रेल्वे अर्थसंकल्पात पुणे जिल्ह्यातील उपनगरीय रेल्वे प्रकल्पांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप

## लोकल फेऱ्या, चौपदरीकरण व नव्या स्थानकांच्या मागण्यांवरून प्रवासी संघ आक्रमक

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड


**रेल्वे अर्थसंकल्पात पुणे जिल्ह्यातील प्रवासी यांच्या समस्या कडे दुर्लक्ष झाले आहे. पुणे लोणावळा दरम्यान सुरू असलेल्या उपनगरीय रेल्वे सेवेला आज 47 वर्ष पूर्ण झाली यात 17 रेल्वे स्थानके व 42 लोकलच्या दिवसभरात ये -जा सुरू आहे . अंदाजे दररोज सव्वा लाख प्रवासीयांची चढ उतार पुणे लोणावळा दरम्यान होते.**



### लोकल प्रकल्पाला अद्याप गती नाही

- पुणे–लोणावळा उपनगरीय रेल्वे सेवेला ४७ वर्षे पूर्ण झाली असून दररोज सव्वा लाखांहून अधिक प्रवासी या मार्गावरून प्रवास करतात.
- ६४ किमी लांबीच्या मार्गावर १७ स्थानके आणि ४२ लोकल फेऱ्या असूनही तिसरी व चौथी रेल्वे मार्गिका अद्याप पूर्ण झालेली नाही.
- राज्य शासनाने ५१०० कोटी रुपयांच्या प्रकल्पास मान्यता दिली असली, तरी रेल्वे अर्थसंकल्पात अपेक्षित गती मिळालेली नाही.
- तसेच, कोरोना काळात बंद केलेल्या गाड्या सुरू न झाल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा चिंचवड प्रवासी संघाने दिला आहे.






64 किलोमीटर लांबीच्या असलेल्या या रेल्वे मार्गावर लोकलसाठी दोन स्वतंत्र रेल्वे मार्गीका झाली तरच लोकल वाढ करता येईल, असे रेल्वे प्रशासनाने वारंवार सांगितले. सध्या 150 हुन अधिक लांब पल्ल्याच्या गाड्या येथील अनेक स्थानकांदरम्यान दुहेरी रेल्वे मार्गावरून गाड्यांची ये–जा सुरू असते. या मार्गावरील लांब पल्ल्याच्या प्रवासी व मालगाड्यांच्या ताण लक्षात घेता चिंचवड प्रवासी संघ १९९० सालापासून पुणे लोणावळा दरम्यान रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण रेल्वे मार्ग पूर्ण व्हावे, अशी मागणी करीत आहे.

आज–तागायत रेल्वेमंत्री पासून आजपर्यंतच्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पुणे, मुंबई रेल्वे अधिकाऱ्यांना लेखी निवेदने दिली. प्रत्यक्ष भेटी घेतले, आंदोलने केली, परंतु प्रश्न सुटला नाही. प्रश्न सुटावा यासाठी प्रवासी संघ कायमस्वरूपी दक्ष असून नुकतेच शेवटी राज्य शासनाने 11 सप्टेंबर 2025 साली महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रश्नाला मान्यता दिली. त्यासाठी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना वेळोवेळी चिंचवड प्रवासी संघाने पाठपुरावा केला त्याची भेट घेवून त्याचे आभार देखील मानले होते. त्यात पूर्ण प्रकल्पासाठी 5100 कोटीची मान्यता देण्यात आली.

सन 2025 ते 2029 दरम्यान पुणे लोणावळा रेल्वे मार्गिका प्रकल्पाचा अंदाजित खर्चाचा तपशील देण्यात आला. तिसरी व चौथी उपनगरीय रेल्वे मार्गिका प्रकल्पामधील गुंतवणुकीचे वेळापत्रकही देण्यात आले. त्यात केंद्रशासन, राज्य शासन, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महापालिका, पिंपरी–चिंचवड महापालिका यांच्या सहभाग आहे.

पुणे जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्यामुळे लोकलच्या फेऱ्या अधिक वाढणे ही काळाची गरज आहे. कष्टकरी, कामगार, महिला, विद्यार्थ्यांना परवडणारी लोकल सेवा असल्यामुळे लोकल वाढीसाठी प्रकल्पाला गती दिली गेली पाहिजे. तसेच माजी रेल्वे राज्यमंत्री सुरेश कलमाडी यांनी 1996 घोषणा केली कि, चिंचवड–रोहा रेल्वे नवीन रेल्वे मार्ग व्हावा. पुणे–तळेगाव–चाकण मार्गे नासीक पर्यंत नवीन रेल्वे मार्ग व्हावा. ही मागणी खडकी, दापोडी, कासारवाडी, पिंपरी, चिंचवड या परीसरात नासीक व चाकण औद्योगिक क्षेत्रात येजा करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात स्थायीक आहे. त्याना फायदा होईल, रेल्वे लोकल सेवा पुणे–चाकण सुरू करता येईल. नागरी वस्तीला फायदा होईल.

सन 2020 पासून कोरोना काळात बंद केलेल्या मुंबई–कोल्हापूर सह्याद्री एक्सप्रेस, पुणे–कल्याण मार्गे नाशिक–भुसावळ एक्सप्रेस, बारामती ते कर्जत पॅसेंजर शटल, मुंबई–पुणे मार्गे सोलापूर एक्सप्रेस या गाड्या त्वरित सुरू करण्यात याव्यात, अशी चिंचवड प्रवासी संघाची मागणी आहे.

आकुर्डी–देहूरोड दरम्यान साडेपाच किलोमीटरचे अंतर असून आकुर्डीच्या पुढे दोन किलोमीटर अंतरावर रावेत हे नवीन रेल्वे स्थानक निर्माण व्हावे. आज रावेत परिसरात सुमारे दीड लाखाहून अधिक लोकसंख्या असून त्यांना पुणे, पिंपरी शहरात ये–जा करणे त्यांच्यासाठी लोकल नवीन स्थानक झाले तर पुणे–लोणावळा तसेच मुंबईकडे व परराज्यात जाण्यासाठीही त्यांची मोठी सोय होईल. यासाठी अनेक वर्षा चिंचवड प्रवासी संघ याचा पाठपुरावा करत असून रेल्वे मंत्री तसेच अधिकाऱ्यांनी या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही तर चिंचवड प्रवासी संघाच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात शहरवासीयांच्या सह्यांची मोहीम तसेच सोसायटीचे पत्रे घेऊन उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार आहोत.

चिंचवड रेल्वे स्थानकावर कोकण, हैदराबाद, सोलापूर, बेंगलोर, मद्रास मार्गावर सध्या ज्या एक्सप्रेस गाड्या ये–जा करतात त्यापैकी महत्त्वाच्या गाड्यांना थांबा मिळाला पाहिजे. आज पुणे रेल्वे स्थानकावर मोठा ताण येत असून प्रवाशांना उभे राहण्यासाठी देखील जागा गर्दीच्या वेळी उपलब्ध होत नाही. चिंचवडला थांबा दिला तर पुणे रेल्वे स्थानकावरील प्रवाशांचा ताण कमी होईल. येथील प्रवाशांचा वेळ, पैसा, शारीरिक श्रमही वाचेल.

सध्या दुपारी 11 ते 3 दरम्यान लोकल सेवाच उपलब्ध नाही. पुणे–लोणावळा मार्गावरती त्यामुळे प्रवासी, महिला, विद्यार्थी, कामगार यांचे अतोनात हाल होत असून त्यांना अनेक समस्यांना सामोरे जाण्याची वेळ येत आहे. पुणे–लोणावळ्या दरम्यान मुंबई प्रमाणे 15 डब्याची लोकल सुरू झाली तर गर्दीचा ताण काहीसा कमी होईल. तसेच पुणे रेल्वे स्थानकावरून लोकल गाड्या न सोडता हडपसर येथून पुणे–लोणावळा मार्गाकडे लोकल सुरू व्हावी, अशी मागणी चिंचवड प्रवासी संघाचे अध्यक्ष गुलाम अली भालदार, नारायण भोसले, मीना अग्रवाल, मुकेश चुडासमा, निर्मला माने, संभाजी बारणे, रजिना फॉन्सिस, वैशाली मिडगुले, मंगल चौधरी, बाळाबाई माने आदींनी ई-मेलद्वारे संबंधित मान्यवरांना केल्या आहेत.




# The Rise of E-Learning in India: A Transformative Shift

**INDIA'S EDUCATION LANDSCAPE HAS UNDERGONE A SIGNIFICANT TRANSFORMATION WITH THE ADVENT OF E-LEARNING, DRIVEN BY TECHNOLOGICAL ADVANCEMENTS, INCREASED INTERNET PENETRATION, AND THE COVID-19 PANDEMIC. THE INDIAN EDTECH MARKET, VALUED AT ₹1,10,198 CRORE ($12.75 BILLION) IN 2024, IS PROJECTED TO SURPASS ₹5,29,384 CRORE ($61.25 BILLION) BY 2035.THIS ARE ESTIMATED FIGURES FROM LAST FEW SOME YEAR DATA AND PROJECTIONS**



Key Drivers of E-Learning Growth

- Internet Penetration: India's internet user base has grown to 900 million, with 65% penetration, making digital education more accessible.
- Government Initiatives: Programs like SWAYAM, DIKSHA, and National Digital University aim to provide accessible education to all.
- Affordable Data Plans: Low-cost data plans have made online learning more affordable, with a gigabyte costing approximately ₹13.98 ($0.16).The data rate is one of the lowest across globe
- Increased Smartphone Adoption: Over 850 million smartphone users have enabled easy access to digital education..With the availability of smartphones ,smart screen and enhanced tech rich features of smartphones has made the elearning process very easy and user friendly

**Benefits of E-Learning**

- Flexibility: Online education allows students to learn at their own pace, anytime, and anywhere..You can understand that even in rural areas now with the help of govt initiatives internet connectivity and quality is increasing day by day
- Accessibility: Remote areas can access quality education, bridging the urban-rural divide.So now one can not say that the privilege is only with urban population only
- Affordability: Online courses are often more economical than traditional classroom education.Many govt organisations are offering free online courses and even some private organisation are providing many free online courses or at minimum charges
- Personalized Learning: AI-driven platforms offer customized learning experiences.

**E-Learning Trends**

- Online Degree Programs: UGC-approved institutions offer full-fledged online bachelor's and master's degrees.
- Skill Development Courses: Short-term modules focus on industry skills like data science, digital marketing, and cloud computing.
- Exam Preparation Platforms: Customized guidance for competitive exams like UPSC, NEET, and JEE.Many state govt are offering free traing and guidance centres for students for such competitive examinations
- Corporate Learning: Professional development opportunities for employees.Now a days many courses like soft skills.subject specilaisations are included in the year long process of employee development

**Challenges and Opportunities**

- Digital Divide: Unequal access to internet and devices in rural areas.With tie these challanges will be nullified or will be brought to minimum
- Digital Literacy: Teachers and students need training in digital tools and cybersecurity.
- Quality Concerns: Ensuring online education meets quality standards.Here the roles of organisation,local governance like zilla parishad ,gram panchayats are very important

The future of e-learning in India looks promising, with the government and private sector investing heavily in digital infrastructure and innovation. As India aims to become a $5 trillion economy, e-learning will play a crucial role in shaping the nation's future..The e learnings industry surely has a bright future because of its easy accessibilty,minimum cost and global expert access saving time and without any time and geographical limitation.

**Ms.Uma Agarwal**
**Primary Educator/Teacher**
**Priyadarshani School,Moshi**

# डॉ. सुशांत पाटील ग्रुप चॅम्पियन्स ट्रॉफी उत्साहात संपन्न

## कर्मचारी एकोप्याच्या क्रिकेट स्पर्धेत DYPTC Legends व Women Warriors विजेते

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**डॉ. सुशांत पाटील ग्रुप चॅम्पियन्स ट्रॉफी ही स्पर्धा अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडली. ही स्पर्धा केवळ क्रिकेटपुरती मर्यादित न राहता, कर्मचारी वर्गामधील एकोप्याची भावना, संघभावना आणि सकारात्मक ऊर्जा यांचा उत्सव ठरली. विविध संस्थांतील कर्मचारी या स्पर्धेत सहभागी झाले होते आणि सर्वांनी उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडवले.**






### एकोप्याचा जल्लोष : चॅम्पियन्स ट्रॉफी यशस्वी

- डॉ. सुशांत पाटील ग्रुप चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडली. कर्मचारी वर्गातील एकोप्याची भावना, संघभावना आणि सकारात्मक ऊर्जा यांचा हा स्पर्धा एक सुंदर उत्सव ठरला.
- पुरुष गटात DYPTC LEGENDS संघाने उत्कृष्ट खेळ करत विजेतेपद पटकावले, तर DYPCOE GLADIATOR संघ उपविजेता ठरला. महिला गटात DYPTC WOMEN WARRIORS संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद मिळवले, तर HO THUNDERBIRDS संघ उपविजेता ठरला.
- स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी क्रीडास्पर्धेची शिस्त व खिलाडूवृत्ती जपली. या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सुशांत पाटील सर व ॲड. अनुजा पाटील मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

पुरुष गटामध्ये DYPIMED SMASHERS, DYPTC LEGENDS, SEAM SUPER STRIKERS, DYPTC TITANS, DYPCOE GLADIATOR, HO ELITE, DYPTC LION'S (H&C) आणि DYPCOEI PANTHER या संघांनी सहभाग घेतला. महिला गटामध्ये HO THUNDERBIRDS, DYPIMED SMASHERS, DYPTC WOMEN WARRIORS आणि DYPCOEI WOMEN TRIES या संघांनी दमदार खेळ सादर केला. संपूर्ण स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी क्रीडास्पर्धेची शिस्त आणि खिलाडूवृत्ती जपली.

चॅम्पियन्स श्रेणीमध्ये पुरुष गटात DYPTC LEGENDS संघाने विजेतेपद पटकावले, तर DYPCOE GLADIATOR संघ उपविजेता ठरला. महिला गटात DYPTC WOMEN WARRIORS संघाने विजेतेपद मिळवले आणि HO THUNDERBIRDS संघाने उपविजेतेपद मिळवले. वैयक्तिक कामगिरीसाठीही अनेक खेळाडूंना गौरविण्यात आले. पुरुष गटात आकाश गायकवाड यांना मॅन ऑफ द मॅच तसेच सर्वोत्तम फलंदाज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महिला गटात आयशा सिंग हिने मॅन ऑफ द मॅच आणि सर्वोत्तम फलंदाज हे दोन्ही पुरस्कार मिळवले. पुरुष गटात दीपक खेलारे यांना मॅन ऑफ द सिरीज पुरस्कार देण्यात आला, तर महिला गटात HO येथील सुचित्रा यांना हा सन्मान मिळाला. पुरुष गटात विठ्ठल राऊत यांना सर्वोत्तम गोलंदाज, तर महिला गटात प्रीती हिला सर्वोत्तम गोलंदाज पुरस्कार प्रदान करण्यात आला. ही संपूर्ण स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. सुशांत पाटील सर आणि ॲड. अनुजा पाटील मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सततचा पाठिंबा लाभला. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे ही स्पर्धा संस्मरणीय आणि प्रेरणादायी ठरली. डॉ. सुशांत पाटील ग्रुप चॅम्पियन्स ट्रॉफीने सर्व सहभागींसाठी आनंद, अभिमान आणि एकत्रितपणाची भावना निर्माण केली असून, या स्पर्धेच्या आठवणी दीर्घकाळ मनात राहतील.

# झोनल कुस्ती स्पर्धेत झिल तंत्रनिकेतनचे दमदार यश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**इंटर इंजिनियरींग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स् असोसिएशन च्या वतीने आयोजित D1 झोनल कुस्ती स्पर्धेचे यजमानपद पिंपरी-चिंचवड पॉलीटेक्निक ने भुषविले. स्पर्धेचे आयोजन पै. मारुतीराव लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती केंद्र, भोसरी याठिकाणी करण्यात आले.**



### मॅटवर खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत १२ तंत्रनिकेतन महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदवला

- ५७ किलो वजनी गटात राजर्षी शाहु तंत्रनिकेतन ताथवडे च्या श्रेयस शिंदे ने झिल तंत्रनिकेतन च्या प्रणव विर चा पराभव केला. ६१ किलो वजनी गटात झिल च्या अभिमन्यू बानगुडे ने जयहिंद च्या ओम मोरे चा पराभव केला
- ६५ किलो वजनी गटात झिलच्या आदित्य भारेकर ने समर्थ च्या आयुष रोकडे चा पराभव केला.
- ७० किलो वजनी गटात भिवराबाई सावंत तंत्रनिकेतनच्या किरण कोळपे ने त्याच कॉलेजच्या सागर घोरपडे चा पराभव केला.
- ७४ किलो वजनी गटात झिल च्या विश्वजित तोरवे ने पिंपरी-चिंचवड तंत्रनिकेतन च्या दुर्वांकुर लांडगे चा पराभव केला.
- ८६ किलो वजनी गटात राजगड तंत्रनिकेतनच्या धिरज सारक ने त्याच कॉलेजच्या आयुष विर चा पराभव केला.
- ९७ किलो वजनी गटात पिंपरी-चिंचवड तंत्रनिकेतनच्या विकून सांगोले ने झिलच्या समीर खुटवड चा पराभव केला.
- १२५ किलो वजनी गटात भिवराबाई सांवत च्या करण ठोंबरे ने कुसरो वाडिया च्या आनंद वाघमारे चा पराभव केला.

या कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा मा. ज्ञानेश्वर लांडगे (प्रथम महापौर-PCMC, माजी आमदार, संस्थापक अध्यक्ष-पवना सहकारी बँक) मा. महेशदादा लांडगे (आमदार-भोसरी विधानसभा) मा. नरेंद्रशेठ लांडगे (युवा-उद्योजक) यांच्या हस्ते पार पडला.

विविध वजनी गटातील विजेत्या व उपविजेत्या स्पर्धकांना मा. नितिनशेठ लांडगे (नगरसेवक, तंत्र संचालक-पवना सहकारी बँक), मा. अमितशेठ गावडे (नगरसेवक), मा. जयनाथ काटे (संचालक-पवना सहकारी बँक), संतोष महाराज लांडगे (सामाजिक कार्यकर्ते), निवृत्ती लांडगे (सामाजिक कार्यकर्ते), सुरेश लांडगे (सामाजिक कार्यकर्ते), राजेंद्र लांडगे (सामाजिक कार्यकर्ते), संतोष मोगदरे (सदस्य-कुस्ती संघटना) यांच्या हस्ते सन्मानपत्र व विजयचिन्हे प्रदान करण्यात आले.

स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी क्रिडा प्रभारित सुनील जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थरकुडे यांनी मेहनत घेतली. प्राचार्य डॉ. विद्या बॅकॉड यांचे मार्गदर्शन लाभले.

पंच विजय कुटे, विशाल मोहिते यांनी काम पाहिले. संघ व्यवस्थापक राहुल पवार, योगेश ठाकरे यांनी काम पाहिले.